**नि. फौ. ख. क्र.३२०/२०१७**

सरकार वि. अजित कारंडे व इतर.

**नि.क्र.४३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– महादेव तुकाराम कारंडे ,</u>**

वय– ५५ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा.निमसाखर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

फिर्यादी माझी पत्नी आहे. दि.१२/०५/२०१७ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता मी विहीरीवर मोटर चालू करण्यासाठी गेलो होतो. अजित कारंडे तेथे आला व तो मला मोटर चालू करायची नाही असे म्हणाला. मी मोटर चालू केली असता अजित कारंडे याने मला मारहाण करायला सुरुवात केली. त्यानंतर त्याचे वडील दिलीप कारंडे तेथे आले. त्या दोघांनी मला लाथाबुक्यांनी खाली पाडून मारहाण करण्यास सुरुवात केली. दोन्ही आरोपींनी मला खाली पाडले व छातीवर डाव्या बाजूला दगड मारला. त्यानंतर माझी पत्नी आवाज ऐकून तेथे आली. तिने सोडवासोडव केली. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेले. माझ्या पत्नीने माझ्या पुतण्याला बोलवून घेतले. त्यानंतर मला लोंढे हॉस्पीटल येथे नेले. त्यानंतर मला सिटी स्कॅन करण्यासाठी बारामती येथे नेले. माझा सिटी स्कॅन करण्यात आला. त्यानंतर पुन्हा मला लोंढे हॉस्पीटल येथे ॲडमिट केले. माझ्या पत्नीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. दुस–या दिवशी पोलीसांनी माझा जबाब घेतला. ज्या दगडाने मला मारहाण केली तो दगड दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला सदर दगड दाखविण्यात आला. त्यास पूर्वी आर्टीकल अ देण्यात आलेले आहे. आरोपी दिलीप व अजित आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.एम.जी.शिंदे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. मला लिहिता वाचता येत नाही. मी पोलीसांना माझ्या जमीनीचा गट नं.४४८ असा सांगितला होता. माझ्या आजूबाजूची व माझी शेती बागायती आहे. आजूबाजूचे शेतकरी त्यांचे शेतामध्ये काम करत असतात का कसे मला माहिती नाही. माझ्या शेताच्या बाजूने असलेल्या रस्त्याने लोक ये जा करत असतात. माझ्या व माझ्या मुलाच्या विरुध्द फौजदारी केस नं.६४०/२०२२ ही प्रलंबित आहे.

**(वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.)**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.१९/०८/२०२६**

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.